Sakal - 11/03/2021

# नागा मुलींच्या वसतिगृहाला देणार किराणा

## चिपळुणात वसतिगृह; मुकुल माधवचा उपक्रम; १८ मुलींना लाभ

**» विधायक**

पावस, ता. १० : रत्नागिरीतील चिपळूण तालुक्यात रेणुका माता नागा लेडीज वसतिगृह असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती हा प्रकल्प चालवत आहेत. भारताच्या ईशान्येकडील भागातील मुलींना चिपळूण येथे आणून त्यांना या प्रकल्पांतर्गत शिक्षण, वसतिगृह, भोजन यांची सोय केली जाते. याचाच एक भाग म्हणून मुकुल माधव फौंडेशन व फिनोलेक्स कंपनी यांच्याकडून या प्रकल्पांतर्गत मणिपूर आणि नागालँडमधील १८ मुलींसाठीचा किराणा खर्च उचलला असून चिपळूण येथे रेणुका माता नागा वसतिगृहात हा कार्यक्रम झाला.




चिपळूण : रेणुका माता नागा वसतिगृहातील मुलींसोबत मुकुल माधव फौंडेशनचे पदाधिकारी.

या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सुरेखा खेडारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती यादव यांच्या हस्ते झाले. महिला सप्ताह उत्सवाचा एक भाग म्हणून या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले होते. या वेळी सचिव मंदार लेले, समन्वयक प्राजक्ता ओक, नगरसेविका श्रीमती गोखले आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या प्रकल्पामुळे नागालँड आणि मणिपूरमधील १८ मुलींना त्यांच्या रोजच्या आहारातील गरजा भागविल्या जातील. श्रीमती खेराडे आणि डॉ. ज्योती यादव यांनी किराणा देण्याच्या या उदार देणगीचे मुकुल माधव फौंडेशन व फिनोलेक्स कंपनीचे कौतुक केले.